मुद्रांक शुल्क १००/-

करारनामा

बुकिंग रक्कम .....+ इसार रक्कम ..... = एकुण रक्कम.....

इसार चिठ्ठी किंमत रुपये :– .....

अक्षरी :– .....

विकीबाबत सौदा एकुण रुपये :– .....

अक्षरी :– .....

लिहुन घेणार :– ..... वय : ..... वर्षे

.....

(पान 2 वर)

Scanned by CamScanner

लिहून देणार :– श्री. महेश शंकरराव गुल्हाणे, वय :– 38 वर्षे
धंदा :– व्यापार, राहणार :– गिताई नगर, वर्धा

इसवि सन 2019 रोजी कारणे इसारा बाबतचा करारनामा लिहुन ठेवीत आहे की, जि. प. वर्धा चे हद्दीतील ग्रा. प. असलेले मौजा सिंदी (मेघे) मौजा नंबर 143 प. ह. न. 19 रजिस्ट्रेशन सबडिव्हीजन वर्धा रजिस्ट्रेशन डिव्हीजन वर्धा ता. जि. वर्धा येथील शेत सर्व्हे नं. 103 प्रस्तावित लेआऊट मधील प्लॉट नंबर ..... अक्षरी .....
लांबी ..... रुंदी ..... क्षेत्रफळ चौरस मिटर .....
चौरस फुट .....

<u>प्लॉटची चतुर्सिमा खालीलप्रमाणे :–</u>

चर्तु:सिमा :
पुर्वेस : ..... पश्चिमेस : .....
उत्तरेस : ..... दक्षिणेस : .....

सदर प्लॉट दर रुपये...../– प्रती चौरस फुट प्रमाणे आम्ही तुम्हास आज या लेखाने एकुण रुपये ...../– चे मोबल्यात विकत देण्याबाबतचा सौदा करीत आहे.

१) इसारापोटी आज रोजी रुपये ..... अक्षरी .....
..... प्राप्त झाले.

२) सौदापोटी उर्वरित रक्कमेपैकी रुपये ..... दि..... पर्यंत घेऊन पावती देवू.
रुपये ..... दि.....पर्यंत घेऊन पावती देवू.
उर्वरित रक्कम रुपये..... दि.....पर्यंत दुय्यम निबंधक वर्धा यांच्या कार्यालयात विकीपत्र रजिस्टर करते वेळी घेवून कायदेशीर विकीपत्र रजिस्टर करुन देण्याचे ठरलेले आहे.

३) मुदतीच्या आत विकीपत्र करुन न घेतल्यास व ठरलेल्या तारखेप्रमाणे इस्टॉलमेंट न मिळाल्यास दिलेली रक्कम परत मिळणार नाही. व सौदा रद्द समजण्यात येईल.

४) लेआऊट मंजूरी नंतर बांधकाम करतांना शासकीय नियम व अटी लागू होतील आणि बांधकाम करणाऱ्यास त्या शासकीय नियम व अटीचे आधिन राहुनच बांधकाम करावे लागेल. त्या बाबतीत विकी करणार म्हणजेच लिहून देणार जबाबदार राहणार नाही.

(पान 3 वर)

Scanned by CamScanner

५) अभिन्यास मंजूरी करुन घेतांना काही फेरबदल झाल्यास जसे प्लॉट नंबर, क्षेत्रफळ व चतु:र्सिमा मध्ये फेरबदल झाल्यास तो घेणार व देणार यांस मान्य राहिल.

६) कराराप्रमाणे तुम्ही विकीपत्र करुन न घेतल्यास करार संपुष्टात आल्यानंतर तुम्हांला त्या संबंधी कोणतेही कायदेशीर कार्यवाही करण्याचा अधिकार व हक्क राहणार नाही. जर काही कारवाही केली तर ती बेकायदेशीर समजण्यात येईल.

७) विकीचे दिवशी प्लॉटचा नकाशा, ७/१२ , व आदेश्याची प्रत देण्यात येईल.

८) हि मिळकत कोणतेही बॅंकेच्या, संस्थेच्या, व्यक्तीच्या कर्जाच्या बोझ्यात नाही तसेच कोणतेही व्यक्तिस अथवा संस्थेस गहाण अथवा हस्तांतरणाचा कोणतेही प्रकारचा लेखं करुन दिलेला नाही. निघाल्यास त्याची सर्वस्वी जबाबदारी लिहून देणार यांचेवर राहील ते त्याचे संपूर्ण निराकरण करुन कायदेशीर बिनबोझयाने विकीपत्र रजिस्टर करुन देतील.

९) प्लॉटचा ताबा विकीचे दिवशी विकी झाल्यावर देण्यात येईल.

१०) लिहून घेणार अथवा लिहून देणार यांचे पैकी जो कोणी विकी करुन देण्यास अथवा करुन घेण्यास टाळाटाळी करेल तो एक दुसऱ्याची होणारी नुकसान भरपाई भरुन देण्यास कायदेशीर जबाबदार राहील.

११) विकीपत्राचा संपूर्ण खर्च लिहून घेणार यांचेकडे राहिल.

१२) हा व्यवहार निव्वळ खरेदीचा असुन सावकारी अथवा व्याज बट्टयाचा नाही.

१३) विकीचे वेळी विकीसाठी आवश्यक ते सर्व कागदपत्र लिहून देणार हे देतील.

करिता हे ईसारचिठ्ठी कोणतीही नशापाणी न करता राजीखुशीने कोणाच्याही दबावाखाली न येता वाचून व समजावुन घेवून त्यावर दोन साक्षीदारांसमक्ष सहया केलेल्या आहेत ते लिहुन घेणार व लिहून देणार यांना व त्यांचे वारसदार/हितसंबंधी यांना पूर्णपणे बंधनकारक व लागू आहे.

दि. / /

लिहून घेणार

.....

साक्षीदार :–

लिहून देणार

१) ..... श्री महेश शंकरराव गुल्हाणे

२) ....

Scanned by CamScanner